# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.03.2026** **वार: शनिवार**

1. चवदार तळे सत्याग्रहातून समतेची मुहूर्तमेढ-मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
2. सर्व तेल शुद्धिकरण कारखाने सर्वोच्च क्षमतेनं सुरु, कच्च्या तेलाचा पुरेसा साठा-केंद्र सरकारचं पुन्हा आश्वासन
3. नवीन प्राप्ती कर कायद्यात कमीतकमी त्रुटी, तंटे आणि अनुपालन खर्च राहील, असा वित्तमंत्र्यांचा विश्वास
4. चिऊताईच्या रक्षणासाठी विविध शाळांमधून उपक्रम आणि
5. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत गतविजेत्या मल्लांचं वर्चस्व

**चवदार तळे-रायगड**

स्वराज्याचा विचार केवळ सत्ता स्थापनेपुरता मर्यादित नसून तो समतेच्या मूल्यांनी समृद्ध झाला पाहिजे, हा संदेश भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड इथल्या चवदार तळे सत्याग्रहातून देशाला दिला, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. चवदार तळे सत्याग्रहाच्या शतक महोत्सवी वर्षाच्या प्रारंभाच्या निमित्तानं झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. चवदार तळ्याचं जलशुद्धीकरण आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी 55 कोटी 80 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून या कामांचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं. हे वर्ष राज्यात 'समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरं करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. एक वृत्तांत...

**बरोबर 99 वर्षांपूर्वी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला होता. चवदार तळे सत्याग्रह केवळ पाण्यासाठी नव्हता तर 'आम्हीही माणसे आहोत 'या भावनेसाठीचा तो लढा होता. या लढ्याने भारतीय राज्यघटनेतील समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाच्या मूल्यांना प्रेरणा दिली गेली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी आज महाड इथं येऊन महामानवास अभिवादन केलं. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाचं वर्ष समता आणि समरसता वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार असल्याचं जाहीर केलं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी चवदार तळ्याचे सुशोभीकरण या वर्षात पूर्ण करण्यासाठी आणि परिसराला ऐतिहासिक सांस्कृतिक आणि पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यासाठी निधी देण्याची घोषणा केली शोभना देशमुख, अलिबाग रायगड.**

**एलपीजी**

देशातील सर्व तेलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेनं कार्यरत असून, त्यांच्याकडे कच्च्या तेलाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, असं आश्वासन केंद्र सरकारनं काल पुन्हा दिलं. देशांतर्गत एलपीजीचं उत्पादन स्थिर असून, त्याचा पुरेसा साठा उपलब्ध आहे असं नवी दिल्ली इथं आंतर-मंत्रालयीन बैठकीत, पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी सांगितलं. गेल्या एका आठवड्यात ग्राहकांना 11 हजार 300 टन व्यवसायिक एलपीजीचा पुरवठा करण्यात आला आहे. देशांतर्गत एलपीजी उत्पादनात 40 टक्क्यांनी वाढ झाली असून, किरकोळ विक्री केंद्रांवर एलपीजीचा साठा संपून जाण्याची कोणतीही समस्या उद्भवलेली नाही. ऑनलाइन नोंदणीचं प्रमाण 93 टक्क्यांपर्यंत पोहोचलं आहे. सिलिंडरचा काळाबाजार आणि साठेबाजीच्या विरोधात काल देशभरात साडे चार हजार हून अधिक ठिकाणी छापे टाकण्यात आले अशी माहिती शर्मा यांनी दिली.

**नवा कर कायदा**

येत्या एक एप्रिलपासून लागू होणाऱ्या नवीन प्राप्तीकर कायद्यामुळे त्रुटी, वाद आणि अनुपालन खर्च कमी राहतील असा विश्वास अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल नवी दिल्ली इथं या कायद्याबाबत जनजागृती करण्यासाठी आयोजित 'प्रारंभ 2026' या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला. यात 'अनुमानित कर आकारणी योजना' अधिक बळकट करण्यात आली आहे. या कायद्यातील प्रत्येक

कलमाची नव्यानं शब्दरचना करण्यात आली आहे, तक्ते आणि सूत्रांद्वारे स्पष्टीकरणं देण्यात आली आहेत. त्यासाठी प्राप्तीकर अधिकाऱ्यांनी 75 हजार मानवी तास खर्च केले आहेत, अशी माहिती सीतारामन यांनी दिली.

## वर्तन बदल

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागानं युनायटेड किंगडममधील चिल्ड्रेन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाऊंडेशनसोबत सामाजिक आणि वर्तन बदल संप्रेषण उपक्रम बळकट करण्यासाठी काल एक सामंजस्य करार केला. राज्यातील राष्ट्रीय आरोग्य उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या करारासाठी विशेष पुढाकार घेतला. या कराराच्या माध्यमातून आरोग्य सेवा अधिक परिणामकारक करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, संवाद माध्यमं आणि समुदाय सहभाग यांचा वापर केला जाणार आहे. विशेषतः कुपोषण, स्वच्छता, लसीकरण आणि आरोग्यदायी सवयी याबाबत जनजागृती वाढवण्यावर भर दिला जाईल.

## चिमणी दिवस-अहिल्या नगर

एकेकाळी अंगणात चिवचिवाट करणाऱ्या चिमण्या आता शहरांसह ग्रामीण भागातूनही लुप्त होताना दिसत आहेत. पर्यावरणातील प्रत्येक जीवाचं अस्तित्व महत्त्वाचं असल्याची जाणीव ठेवत जागतिक चिमणी दिवसानिमित्त काल राज्यातल्या विविध शाळांमध्ये मुलांना चिमण्यांचं रक्षण आणि संवर्धन करण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे उद्बोधन करण्यात आलं.

अहिल्यानगर जिल्ह्यात राजूर इथल्या श्री समर्थ माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात 'पक्षी वाचवा, चिमणी वाचवा' अभियानांतर्गत पक्ष्यांसाठी घरटी तयार करणं, पाणीपात्र ठेवणं, धान्य वाटप आदी कार्यक्रम राबविण्यात आले. 'उठा उठा चिऊताई', 'चिऊताई चिऊताई दार उघड' यांसारख्या कवितांपासून पंचतंत्रातील गोष्टींपर्यंत विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. टाकाऊ वस्तूंपासून घरटी बनविण्याचं प्रशिक्षण, छायाचित्रांवरून पक्षी ओळखण्याचे खेळ यामुळं विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

सामाजिक कार्यकर्ते अनिकेत चांडोले आणि विवेक जगदाळे यांनी विद्यार्थी, शाळा आणि मंदिरांना अल्प किंमतीत घरटी मोफत वितरित केली. चिमण्यांना पिण्यासाठी आणि अंघोळीसाठी पाणी तसंच धुळीची आवश्यकता असते. मात्र काँक्रिटीकरणामुळं त्यांच्या नैसर्गिक अधिवासावर परिणाम झाला आहे. चिमण्या त्यांच्या पिलांना प्रथिनयुक्त अन्नाऐवजी उरलेलं अन्न देत असल्यानं त्यांच्या वाढीवर परिणाम होत असल्याचं निरीक्षण त्यांनी मांडलं.

## चिमणी दिवस-सांगली

सांगली जिल्ह्यातील ईश्वरपूर इथं सद्गुरु आश्रमशाळेत "जागतिक चिमणी" दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी टाकाऊ साहित्याचा वापर करून चिमण्यांसाठी आकर्षक आणि उपयुक्त घरटी तयार केली. शाळेचे मुख्याध्यापक आष्पाक आत्तार याप्रसंगी बोलताना म्हणाले...

**आमच्या ईश्वरपूर येथील सद्गुरु आश्रमशाळेत जागतिक चिमणी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण संरक्षण व चिमण्यांचे संवर्धन याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आम्ही शाळेमध्ये घरटी बनवण्याचा उपक्रम घेतला. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी टाकाऊ साहित्याचा वापर करून चिमण्यांसाठी आकर्षक व उपयुक्त घरटी तयार केली. जुन्या बाटल्या बॉक्स, कागद, लाकडी तुकडे अशा विविध साहित्यापासून तयार करण्यात आलेल्या घरट्यांमुळे विद्यार्थ्यांची कल्पकता आणि पर्यावरणपूर्वक दृष्टिकोन अधोरेखित झाला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी चिमणी वाचवा पर्यावरण वाचवा, निसर्गाचे रक्षण आपले कर्तव्य अशा विविध घोषवाक्यांद्वारे जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. चिमण्यांचे पर्यावरणातील महत्त्व आणि त्यांची घटती संख्या याविषयी माहिती देत आम्ही विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. संस्थापक सचिव एकनाथराव जाधव, सहसचिव सत्यजित जाधव, संचालक रणजित जाधव यांनी हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून समाजासाठी गरजेचा आहे असे सांगत या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.**

## मराठी नाट्य संमेलन

101 व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बुधवारी झालेल्या नियामक मंडळ सभेत एकमतानं हा निर्णय घेण्यात आला. शंभराव्या

नाट्यमहोत्सवाची सांगता 24 ते 26 एप्रिलदरम्यान रत्नागिरी इथं होणार आहे, अशी माहिती प्रमुख कार्यवाहक अजित भुरे यांनी दिली आहे.

**<u>पाऊस-नुकसान</u>**

पुणे जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांत झालेल्या पावसामुळं शेती पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दूरध्वनीवरून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याशी संपर्क साधून नुकसानाची सविस्तर माहिती घेत तातडीनं पंचनामे करण्याचे निर्देश दिले.

**<u>अकोला</u>**

अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात एक तास गारपिटीसह झालेल्या पावसामुळं काढणीच्या अवस्थेत असलेल्या गहू, कांदा पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. आंबा, टरबूज आणि खरबूज या फळपिकांनाही गारपिटीचा तडाखा बसला.

**<u>धुळे</u>**

धुळे जिल्ह्यात पाऊस आणि गारपीटीसह वादळी वाऱ्यांमुळं विविध तालुक्यातील काही गावांमध्ये पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. या नुकसानाचे तातडीनं पंचनामे करण्याचे निर्देश पालकमंत्री जयकुमार रावल यांनी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांना दिले आहेत.

**<u>परभणी</u>**

परभणी जिल्ह्यातील जोगवाडा शिवारात अंगावर वीज पडून एक बैल ठार झाला. त्यामुळं शेतकऱ्याचं मोठं नुकसान झालं.

**<u>कुस्ती</u>**

पुण्यात वाघोली इथं 68 व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत गतविजेत्या मल्लांनी काल वर्चस्व गाजवत तिसऱ्या फेरीत धडक मारली. गतविजेता हिंगोलीचा सिकंदर शेख, नांदेडचा शिवराज राक्षे, पुणे शहराचा पृथ्वीराज मोहोळ, कोल्हापूरचा पृथ्वीराज पाटील आणि नाशिक शहराचा हर्षवर्धन सदगीर यांनी स्पर्धेची तिसरी फेरी गाठली. गादी आणि माती या दोन विभागातून या कुस्तीपटूंनी ही चमकदार कामगिरी केली.

**<u>हवामान</u>**

दक्षिण मध्य महाराष्ट्रात आज तुरळक ठिकाणी वीजा, जोराचे वारे यांच्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातही असंच हवामान राहण्याचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.